# UNIVERSITY GRANTS COMMISSION

## Submission of Minor Research Project

On

"Marathi Mulkhatil Lokrangbhumivar Gajalele

Nivdak Dalit Loknayak"

- Submitted by -

**Mrs. D.D.Ramteke**

Assistant Professor in Dramatics

**Mrs. K.S.K. Alias Kaku Arts, Science &**

**Commerce College, Beed.**

- Through -

**Dr.Babasaheb Ambedkar Marathwada**

**University, Aurangabad.**

**August - 2015**

# Summary of minor Research Project

Marathi mulkhatil lokrangbhumivar Gajalele
Niivdak Dalit Loknayak.

Principal Investigator -
Mrs. Ramteke D.D.
Assist. Prof. Dept. of Darmatics
Sau K.S.K. College, Beed.

# मराठी मुलखातील लोकरंगभूमीवर गाजलेले निवडक दलित लोकनायक

I) प्रस्तावना (Introduction) :-

लोकपरंपरेत सादर झालेली रंगभूमी म्हणजे लोकरंगभूमी होय. मराठी लोकरंगभूमीवर सादर होणारा प्रत्येक नाट्यप्रयोग हा प्रेक्षक सापेक्ष असल्यामुळे लोकजीवनाचे अनेक संदर्भ या रंगभूमीला प्राप्त झाले आहेत. मराठी लोकजीवनाची सांस्कृतीक अभिव्यक्ती म्हणजे लोकपरंपरेत सादर झालेली 'लोकरंगभूमी'.

"जेथपर्यंत महार, तेथपर्यंत महाराष्ट्र" या उक्तीप्रमाणे या कलांची व्याप्ती आपल्या लक्षात येते. कंठाचा गोडवा, बोलण्याचे चातुर्य, सगय-सूचकता आणि विविध वाद्यांवर हुकुमत या बाबी दलित कलावंतांच्या ठिकाणी आढळून येतात आणि विशेष म्हणजे परंपरने चालत आलेल्या या लोककला नागर समाजातील कलांना समांतर म्हणून राहिलेल्या आहेत.

'शुद्र' हा पहिल्यापासूनच सर्व गोष्टींपासून वंचीत केला गेला. सरंजामी राजवटीत तर त्याला मुख्य प्रवाहापासून दुर फेकल्या गेले. एखादी सामाजिक संस्था जेंव्हा दडपून टाकण्यात येते, तेंव्हा तो समाज आपल्यावर पडलेल्या दडपणाला दुर हटविण्यासाठी क्रांती करुन उठतो. ही क्रांती राजकीय, सामाजिक किंवा सांस्कृतीक असू शकते. याच उर्मितून दलितांनी आपली स्वतंत्र कलानिर्मिती केली. मराठी मुलखात आढळणाऱ्या तमाशा, दशावतार, खडी गंम्मत, दंडार इत्यादी लोककला या सांस्कृतीक क्रांतीमधूनच उदयास आलेल्या आहेत. या सर्व लोककला प्रकारचे संगोपन आजही दलितांद्वारे होऊ लागले आहे. हे सांगण्याचा प्रयत्न प्रस्तुत शोधप्रबंधात करण्यात आला आहे.

**संशोधनाची ध्येय आणि उद्दीष्ट्ये (Objectives) :-**

या लोकनायकांचा अभ्यास करतांना काय निष्कर्ष हाती येतात ते पहावयाचे होते. दलित लोकरंगभूमी हा वैशिष्ट्येपुर्ण अभ्यास आहे. यातून साकारलेल्या दलित रंगभूमीने कोणते प्रयोग केले ? प्रयोगदृष्ट्या निर्मिती, सादरीकरण, लेखन, रंगतंत्र, दिग्दर्शन, अभिनय व प्रेक्षक यांचे काय महत्व आहे ? आणि याच दृष्टीकोनातून मराठी रंगभूमी आणि दलित रंगभूमी यांच्यातील फरकांचा अभ्यास केलेला आहे. या लोकरंगभूमीतून बुद्ध-फुले-शाहु-आंबेडकरी विचार अत्यंत प्रभावीपणे मांडल्या जाऊ शकतो हे देखील मी अभ्यासात नोंदविले आहे.

**संशोधनाची ध्येय आणि उद्दीष्ट्ये (Objectives) :-**

या लोकनायकांचा अभ्यास करतांना काय निष्कर्ष हाती येतात ते पहावयाचे होते. दलित लोकरंगभूमी हा वैशिष्ट्येपुर्ण अभ्यास आहे. यातून साकारलेल्या दलित रंगभूमीने कोणते प्रयोग केले ? प्रयोगदृष्ट्या निर्मिती, सादरीकरण, लेखन, रंगतंत्र, दिग्दर्शन, अभिनय व प्रेक्षक यांचे काय महत्व आहे ? आणि याच दृष्टीकोनातून मराठी रंगभूमी आणि दलित रंगभूमी यांच्यातील फरकांचा अभ्यास केलेला आहे. या लोकरंगभूमीतून बुद्ध-फुले-शाहु-आंबेडकरी विचार अत्यंत प्रभावीपणे मांडल्या जाऊ शकतो हे देखील मी अभ्यासात नोंदविले आहे.

१) दलित लोककलावंत हा आधीपासूनच हरहुन्नरी राहीलेला आहे. परंतु उत्कृष्ट अभिनयामध्ये, त्याची कधीच दखल घेण्यात आलेली नाही. त्यांच्या अभिनय कौशल्याबाबत ही मला चिकित्सक अभ्यास केलेला आहे.

२) दलित लोकनायकांनी आपली सारी हयात लोकरंगभूमीत घालविली. परंतु त्याचे स्मरण नागर मराठी रंगभूमीने कधी केले नाही. तेव्हा मी एक दलित रंगकर्मी म्हणून ह्या लोककलावंतांना स्मरणात ठेवण्यासाठी आणि दुसऱ्यांना स्मरण करुन देण्यासाठी केलेला हा अट्टाहास, म्हणून मला या बाबीवर संशोधन करायचे आहे.

३) दलितांच्या लोकरंगभूमीतून उदयाला आलेल्या मराठी दलित रंगभूमीचा अभ्यास करणे.

४) मराठी दलित रंगभूमीवर सादर होणाऱ्या नाटकांचे सादरीकरण, लेखन, रंगतंत्र, दिग्दर्शन, प्रेक्षक प्रतिसाद सर्व बाबींचा अभ्यास करणे. फिल्डवर्क आणि प्रत्यक्ष मुलाखत घेऊन लोकनायकांवर सविस्तर चर्चा करणे.

५) संशोधनातून प्राप्त झालेले निष्कर्ष नोंदवले आहे.

**अभ्यासाचे महत्त्व :-**

महाराष्ट्रातील गेल्या सव्वाशे वर्षातील लोकरंगभूमीचे संगोपन महार-मांगांनी, कोल्हाटी, गोंधळी या जातीने केले आणि लावणी, पोवाडे, वग या कलाप्रकारांना शुद्र जातीतील लोककलावंतांनी उच्च स्थानावर नेवुन ठेवले; पण **प्रतिष्ठा दिली गेली ; रामजोशी, पठ्ठेबापूराव यांनाच.** शामा बापू मांग व तात्याबा सावळजकर या पिता-पुत्रांनी आपली सारी हयात शाहीरीत घालविली. त्याचे स्मरण मराठी नाट्य कलेला व मराठी रंगभूमीला कधीच झाले नाही. मग त्यांना मानाचा मुजरा तर दूरच. १९ व्या शतकातील उत्तरार्धात समाज प्रबोधनाचे व्रत घेऊन पाखंडी संवाद लिहणाऱ्या दलितांच्या पहिल्या नाटककराचे, **गोपाळ बाबा वलंगकरांचे** कुणाला स्मरण आहे ? पठ्ठेबापूरावांशी सतत सहा महिने झुंज देऊन त्यांचा पराभव करणाऱ्या हरहुन्नरी व बहुभाषी **भाऊ फक्कडला** वंदन करण्यासाठी कुणाचे हात सरसावले ? **किसन फागू बंदसोडे, हरिभाऊ वडगावकर, भिमराव करडक, केरूबुवा गायकवाड, नामदेव व्हटकर** यांच्या नावाचा कुणी गजर केला? आण्णा **भाऊ साठ्यांना** मराठी रंगभूमीने कधी वंदन केले आहे काय ? या सर्व शिल्पकारांच्या खांद्यावर आजची दलित रंगभूमि उभी आहे.

समता, स्वातंत्र्य, बंधुता आणि सामाजिक न्याय या वैश्विक मानवी मुल्यांची प्रतिष्ठापणा करून रंजन, प्रबोधन, उद्बोधन करू पाहणाऱ्या लोककलावंतांचा पुर्वग्रहमुक्त, डोळसपणे व तटस्थपणे विचार होणे आवश्यक

आहे. त्यांचा चिकित्सक अभ्यास होणे गरजेचे आहे. म्हणून मी संशोधनासाठी "मराठी मुलखातील लोकरंगभूमीवरील निवडक दलित लोकनायक" हा विषय निवडला होता.

**तमाशा आणि कलाकारांच्या पूढील अडचणी :-**

पूर्वी तमाशाला राजाश्रय होता. राजा, महाराजा, गावाचा प्रमुख, जमीनदार, सरपंच, पाटील यांच्या आश्रयाने आणि त्या काळचे तमाशाप्रधान चित्रपटाच्या माध्यमातून तमाशा जिवंत राहिला. यावेळी लोकरंजनाच्या प्रकाराला बरे दिवस होते. मात्र नंतर त्याकडे लोकांकडून मडक कला म्हणून पाहिले गेले आणि तिच्या नशिबी पंचिताचे जीवन आले. आज तमाशाचा मालक सर्व कलाकारांना बरोबर घेऊन त्यांच्यात योग्य समन्वय राखून सगळयांच्या अडचणी सोडवत महिला कलाकारांची काळजी घेत खेळ करण्यासाठी सदा सहा-सहा, आठ-आठ महिने गावोगाव भटकत असतो. तमाशातील या कलाकारांना दौरा करणसाठी जाण्याअगोदर उचल द्यावी लागते. त्यासाठी ठेकेदाराकडून कर्जाऊ किंवा आगाऊ रक्कम उचलली जाते. ज्यातून वाहन खर्च, कलाकार, वाद्य आणि जेवण यांचा खर्च करावा लागतो. नेहमी उपेक्षितांचं जीणं नशिबी आलेला हा खेळातील राजा खेळ संपल्यानंतर लाचार आणि असहाय्य होऊन ख-या जगण्यासाठी संघर्ष करत असतो. खेळाची सुपारी मिळावी म्हणून धडपडत असतो. एखाद्या गावी हुल्लडबाज प्रेक्षकांकडून येणारा वाईट अनुभव, वाईट नजरा, समाजाची हेटाळणी सहन करुनही हे कलाकार रसिकांची सेवा करत असतात.

आज शासन दरबारीसुध्दा उपेक्षितपणाची वागणूक मिळत असल्यामुळे महाराष्ट्राची ही रांगडी नगरी महाराष्ट्राच्या संस्कृतीच्या प्रवाहात अखेरच्या घटका मोजत आहे. यातील कित्येक कलाकारांचे नाव सरकारदरबारी नोंद नसल्यामुळे त्यांना मिळणारी पेन्शन, मोफत औषधोपचार, मोफत प्रवास यासारख्या जीवनावश्यक सोयी सुविधांपासून त्यांना वंचित रहावे लागते आहे. नेहमी

हेटाळणीच्या नजरा पाहत आलेल्या या लोकांना समाजामध्ये अजूनही मानाचे स्थान मिळालेले नाही. भविष्यातील बदलत्या दिवसांची गरज ओळखून मुलांना उच्च शिक्षण-संस्कार दिले. मात्र मुलींचे लग्न जमवताना समाजाकडून मिळणारी हीन वागणूक त्यांनी आमचा स्वीकार न केल्याचा अनुभव देतो असे महादेवराव मनवकरांच्या सांगण्यातून आले. अगदी सुरुवातीच्या काळात एका तमाशा फडात एक नाच्या पो-या आणि दहा ते बारा माणसे असत. खेड्यातील जत्रेच्या वेळी गावकरी त्यांच्याकडून रात्रभर तमाशा करुन घेत व त्याबद्दल त्यांना पायली दोन पायली दाणे देत असत. हेच त्यांचे मानधन. ही प्रथा साधारणपणे १९२० पर्यंत होती. पुढे १९२५ पासून तमाशामध्ये नाच्या पो-याऐवजी कोल्हाटनी आणि इतर स्त्रिया आल्या. त्यावेळी एका ढोलकी फडात पंधरा ते वीस तमासगीर व संगीत बारीला रोज पाच ते दहा रुपये आणि ढोलकी तमाशा फडाला दहा ते पंधरा रुपये बिदागी मिळे. त्यानंतर मात्र ही बिदागी अनुक्रमे पंधरा ते चाळीस व पंचवीस ते साठ रुपयांपर्यंत वाढत गेली. पुढे १९५० नंतर बरेच तमासगीर आपापले स्वतंत्र फड गावोगावी नेऊन कनातीतून तमाशाचे खेळ करु लागले. त्यांच्या फडात आठ-दहा नाचणा-या स्त्रिया, सोंगाड्या, चार ढोलकीवाले, हलगीवाले व इतर कामासाठी गडी माणसे असा मोठा ताफा आणि तंबू, राहुट्या, लाईट, जनरेटर इत्यादी सरंजाम असे. त्यामुळे या सर्वांचा मिळून त्यांना बराच खर्च येई. ते जत्रा, उरुस प्रसंगी गावक-यांकडून सुपाऱ्या घेत. त्यांना एकावेळी पन्नास ते दोनशे रुपयांपर्यंत बिदागी मिळे आज हा आकडा बाराशे ते तीन हजारांवर गेला आहे. या फडातील काही कलावंत रोजंदारीवर, तर काही मासिक पगारावर असतात. मिळणा-या तुटपुंज्या मेहनताण्यावर घर-संसार सांभाळण्याची कसरत हे लोककलावंत करत असतात. सर्व बाजूंनी उपेक्षितांचं जगणं जगणा-या या कलाकारांची शारीरिक आणि माणुसकीच्या आश्रयासाठी चाललेली धडपड पाहून मन हेलावून जातं. महाराष्ट्राची ही अभिजात कला जर जोपासली नाही तर भविष्यात **ही कला दिसणारही नाही** म्हणून महाराष्ट्राच्या या रांगड्या

कलाप्रकाराला पूर्वीसारखा राजाश्रय (शासकीय) आणि लोकाश्रय मिळणे ही काळाची गरज आहे. नाही तर ही लोककला अस्तंगत होऊन फक्त इतिहासातील एक वाचनीय भाग होऊन राहील याची भीती मनाला राहून राहून वाटते.

म्हणून शासनाने आजच दखल घेऊन लोप पावत चाललेली ही कला जोपासावी. त्यांना पेन्शन वेळच्या वेळी द्यावे. पेन्शन देताना वयाची अट कमी करावी. पेन्शन देताना कागदपत्रांची पूर्तता करणसाठीही शासनाने ब-याच अटी दिलेल्या आहेत. तेव्हा हे लोककलावंत खेड्यातील आहेत. गावातील आहेत. मग अमुक प्रमाणपत्र, तमुक कागदपत्र पाहीजे असाही आग्रह धरु नये. तो कलावंत आहे ना. इतके वर्ष त्याने कलेद्वारे प्रेक्षकांचे मनोरंजन केलेले आहे ना हा पुरावा काय कमी आहे ? शासनाने प्रमाणपत्रांच्या बाबतीत या गरीब कलावंतासमोर एवढ्याही अटी ठेवु नये. शिवाय तमाशा फडाला **संरक्षण** नाही. त्याचीही व्यवस्था शासनाने करावी आणि असे झाले तर या लोककलेला राजाश्रय (शासकीय) आणि लोकाश्रय मिळेल व **एक होता तमाशा** असे म्हणायची वेळ येणार नाही.

------------

**Ajanta Prakashan**

## An ISO 9001:2008 QMS

## ISBN / ISSN

*An International Multidisciplinary Half Yearly Research Journal*

*IDEAL*

*As Hereby Awarding This Certificate To*

दुष्यंता देविदास रामटेके

*An Recognition Of The Publication Of The Paper Entitled*


आदिवासी लोककला, सृजनशील नाट्याविष्कार

यांचे जतन करणे.....काळजी गरज!

*Ideal Volume - I, Issue - I*

*ISSN 2319-359X September-February 2012-13*

*Editor : Vinay S. Hatol*


AN INTERNATIONAL MULTIDISCIPLINARY
HALF - YEARLY RESEARCH JOURNAL
ISSN 2319-359X
IDEAL
Volume No.I
Issue No.I
September-February 2012-13
MENA
SOURCING
FOR TALENT
BRAZIL
RISK BASED
GOVERNANCE
CHINA
INNOVATION
INDIA
MANAGING CULTURAL
DIVERSITY
AJANTA PRAKASHAN

25

# आदिवासी लोककला, सृजनशील नाट्यविष्कार यांचे जतन करणे.... काळजी गरज !

* श्रीमती. दुष्यंता देविदास रामटेके
सहा. प्राध्यापक, नाट्यशास्त्र विभाग, सी. के. एस. के. महाविद्यालय, बीड.

रंगभूमी ही एक सामाजिक व सांस्कृतिक संस्था आहे, ती समाजातून निर्माण होते आणि ती समाजाच उत्क्रांत असते. मानवी जीवनाचे नाट्य पकडणारे वाङमय, समाज आणि संस्कृतीच्या अंगाने निर्माण होत असते. रंगभूमी अथवा नाट्य नाट्यमयतेचे अविष्कार, जीवनातील संघर्ष आणि सभ्यता ही संस्कृतीची अंगे असतात. लोकसाहित्य हा लोकजीवनाचा आरसा आहे. लोकजीवनातून लोकसंस्कृतीचे जडणघडण होत असते. म्हणून लोकसाहित्याचे अध्ययन हे लोकसंस्कृतीचे अध्ययन असते. हे डॉ. व्यवहारे यांनी लोकसाहित्य आणि लोकसंस्कृती या पुस्तकातून स्पष्टपणे मांडले आहे. लोकसाहित्याचे खरे वारसदार वेदपूर्व काळातील आदिम आहेत. दऱ्याखोऱ्यात, रानावनात राहणारे आदिवासी. आदिवासी म्हणजे कोण ? नागर संस्कृती पासून अलिप्त असलेले, दुर्गम भागात राहणारे, आपली स्वतःची अशी जीवन पद्धती असलेले आणि त्याच्या भागातील मूळ रहिवासी म्हणजे आदिवासी. आजही शहरी संस्कृती पासून दूर असले, ग्रामीण भागात राहत असले तरी सुद्धा लोकसंस्कृतीचे जतन करणारे हेच लोक आहेत. नागर संस्कृतीतील लोक God is Nature म्हणतात, तर आदिवासी मध्ये Nature is God असे मानले जाते. आदिम काळात, आदिमांनी तेजाळणारा गोल पाहिला, त्याचा प्रकाश आपल्या जीवनाला उपकारक आहे याचा अनुभव त्यांना आला आणि त्यांनी त्याला देवत्व बहाल केले. पुढे हाच तेजाचा गोल त्यांचा देव झाला सूर्यदेव ! आणि त्याची उपासना लोकमानसात रुजली. अशीच निसर्गातील, निसर्गशक्तीचा, निसर्गतत्त्वाचा संबंध, आदिमांनी आपल्या जीवनाशी अर्थ लावून जोडला. निसर्गातील जे गूढ अनाकलनीय, ते ते सर्व पूजनीय आहे असे ते मानतात. त्यांना प्रसन्न करण्यासाठी विधी करण्यात येतो. हा विधी नाट्याचाच भाग आहे. परंतु हे अविष्कार नाट्यप्रयोग म्हणून नाही तर विधी म्हणून करण्यात येतो. आदिवासींच्या पारंपारिक अविष्कारांचे स्वरूप कलात्मक अविष्काराचे असल्यामुळे संगीत, नृत्य, नाट्य यांनी त्यांना जणू नाट्यप्रयोगाचे स्वरूप प्राप्त होते. नृत्यनाट्य म्हटले तरी चालेल. आदिवासी लोकगीत आणि लोकसंगीताचा स्वतंत्र अभ्यास संगीतशास्त्रात करू शकतात. तसेच नाट्यशास्त्राच्या अभ्यासकांना त्यांच्या नृत्यनाट्याचा अभ्यास स्वतंत्रपणे करता येऊ शकतो आणि तो करावा. कारण, आदिमांचे हे नृत्यनाट्य जेव्हा भरत अवगत नव्हती तेव्हापासून आपले स्वतंत्र अस्तित्व ठेऊन अजूनही टिकून आहेत. नाट्यशास्त्र विषयात नाटकांचा उगम सांगताना **वाघाची गोष्ट** सांगितल्या जाते, एक शिकारी, वाघाची शिकार करायला गेला सूर्यास्त होण्याची वेळ आली तरी त्याला वाघ नाही पण ससा देखील दिसला नाही, तो खूप उदास झाला. त्याच्या मनात आत्महत्येचे विचार येऊ लागले. अशातच त्याला वाघ दिसला. शिकारीसाठी त्याने तयार केलेले काही अवजार होते. वाघाने झडप घेतली, तसेच त्यानेही वार केला. दोघांच्या झटापटीत वाघ मृत्युमुखी पडला. त्याचा आनंद गगनात मावेनासा झाला. तो त्या वाघाला ओढत आपल्या समुदायात घेऊन आला व झालेला प्रसंग नृत्यनाट्याद्वारे रंगवून सांगू लागला. तो करत असताना त्यातून करुण रस ओसरू लागला. मग वाघ दिसला हे दाखविण्यासाठी त्याने वाघाचे कातडे अंगावर घेतले. नंतर त्यांच्यातील झटापट त्यातून शिकाऱ्याच्या चेहऱ्यावर वीर रसाची पालवी दिसायला लागली. शिकाऱ्याच्या आनंदात इतरही सहभागी झाले व नृत्याद्वारे आनंदोत्सव साजरा करू लागले. नंतर समूहातील प्रत्येकजण नृत्यनाट्याद्वारे आपला अनुभव सांगू लागला आणि नाटकाची निर्मिती झाली.

मी आधी नमूद केल्याप्रमाणे विधी करण्यासाठी नृत्यनाट्ये होती. परंतु आता वास्तुविषयक नृत्यालाही सुरुवात झाली. यामध्ये जसे घडले, असे वाटते त्याप्रमाणे कल्पनाशक्तीद्वारे नृत्यनाट्यातून दाखविण्याचा प्रयत्न केला जातो. यामध्ये शिकार नृत्य, पाऊस नृत्य,

युद्ध नृत्य हे सर्व नवुक्रियाच असतात. प्रभाकर मांडे यांनी आदिवासींच्या रंगभूमी विषयी सविस्तर विवेचन केले आहे. आदिवासींच्या रंगभूमीवरील एकूण नाट्यमय अविष्काराची पुढील लक्षणे सांगता येतील.

१) निसर्ग आणि ऋतु यातील बदलांशी त्यांचा संबंध असतो.

२) आदिवासींच्या नृत्यनाट्यात मुखवटे लेऊन मुखवट्यांचा वापर होतो.

३) धर्म विधींशी त्यांचा संबंध असतो.

४) भयावहपणे नृत्यनाट्य देवत्वपणाचा अनुभव देणारे असते.

५) आदिवासींच्या नृत्यनाट्याला रंगमंच नसतो.

६) आदिवासींचे नृत्यनाट्यही सर्वच समूहनाट्य असतात.

७) त्यात नृत्यसंगीत-गायन-अभिनय यांचा सुरेख मेळ असतो.

८) रंगभूमीवर मांडली जाणारी सर्व गाणी पारंपारीक असतात.

९) वेशभूषा, रंगभूषा सभोवती आढळणाऱ्या सामुग्रीच्या आधारे केली जाते.

१०) मुखवटे, टोप बनविण्याचे काही प्रकार आणि तंत्र असतात.

अभिजनांच्या रंगसंकल्पनेपेक्षा एकदम वेगळी असणारी आदिवासी रंगभूमी जुनाट आपले स्वातंत्र्य अस्तित्व टिकवून आहे. भारतीय परंपरेतील नाट्याविष्काराचे अत्यंत सूक्ष्म, सखोल आणि विस्तृत शास्त्रीय विवेचन भरताने त्यांच्या नाट्यशास्त्र या ग्रंथात केले. त्यात लोकधर्मी आणि नाट्यधर्मी या दोन्हीही अभिनय या विशेषांची चर्चा आढळते. यावरून समाजामध्ये परंपरेने हे दोन्हीही नाट्याविष्कार प्रचलित असल्याचे स्पष्ट होते. आदिवासींचे नृत्यनाट्ये आणि दंडार सारखे नाट्यप्रयोग प्रचलित असल्याचे स्पष्ट होते. आदिवासींची नृत्यनाट्ये आणि दंडार सारखे नाट्यप्रयोग त्यांच्या जीवनाचे अंग झाले. त्यात आता थोडा बदल जरी झाला तरी आधुनिक काळात बाह्यप्रभाव पचवूनही या आदिवासींच्या रंगभूमीचे स्वतःचे निराळेपण कायम राखले आहे. आजही ही रंगभूमी त्याच मार्गाने उभी आहे. व्यवसायीक रंगभूमीमध्ये रंगभूमीवर काम शोधले जाते. तर या लोकरंगभूमीत कामामध्ये रंगभूमी शोधली जाते हा परस्परविरोधी फरक आपल्याला पहायला मिळतो. म्हणून तर मैदान, रस्ता हीच त्यांची रंगभूमी. कला ही आदिवासींच्या नसानसात भिनली आहे. नृत्य, गायन, वादन, अभिनय या कलाविष्काराशिवाय निरनिराळ्या प्रकारच्या वस्तू, आकृत्या, मुर्ती, नक्षीकाम, चित्रे, पोशाखावरील कशीदा - विणकाम याशिवाय दगड, लाकूड, रंगीत खडे, रंगीत बिया यांच्यापासून तयार केलेले अलंकारही कलात्मक आणि सुंदर असतात. उपजीविकेसाठी धनुष्यबाण, मासे पकडण्यासाठी जाळी, मडी, प्राणी पकडण्याचे सापळे, दगडाची व लाकडाची विविध प्रकारची औजारे इत्यादींमधून त्यांच्या कलागुणांचा अविष्कार घडतो.

महाराष्ट्र राज्यात आदिवासींचे भौगोलिक वर्गीकरण केले तर, १. सह्याद्री विभाग २. सातपुडा विभाग ३. गोंडवन विभाग मी स्वतः गोंडवण विभागातील असल्यामुळे तेथील काही जमातींच्या नृत्य प्रकारावर नजर टाकू :

गोंडवण विभागात चंद्रपूर, यवतमाळ, गडचिरोली, भंडारा, नागपूर जिल्ह्यांचा समावेश होतो. त्यामध्ये कोरकु, गोंड, कोलाम, परधान, राजगोंड, माडीया या जमाती आढळतात.

## माडीया

नैसर्गिक जीवन जगणारे आदिवासी भौतिक संस्कृतीपासून अलिप्त आहे. ते लोककला व लोकनाट्यांचे अनुसरण करतात. ही अतिमागास जमात म्हणून ओळखली जाते. त्यांचे रेला नृत्य, देवोस नृत्य, दसरा पाटा गीत, विवाह गीत, विलासाचे गीत इत्यादी अभ्यासपूर्ण आहे.

परधार

गोंडांची अनात परधान आहे. राजपरधान, गोंडपरधान, थोटीपरधान, अशा त्यांच्या उपजाती आहेत. ही जमात अतिशय बुद्धिमान असते. वन हे त्यांचे प्रिय स्थान आहे. विवाह गीते आणि सणांची गाणी यांचा खजिनाच त्यांच्याकडे आहे. त्यांचा मुख्य व्यवसाय शेती आहे. त्यांना ग्रामीण संगीतकार (Village Musician) असे म्हटले जाते.

गोवारी

गोवारी ही अहिर आणि गोंड यांच्यापासून बनलेली मिश्र जमात आहे. यामध्ये गायगोरी, ईंगा गोवारी, गोंड गोवार या पोटजाती आहेत.

माना

हिस्लॉप यांच्या मतानुसार चंद्रपूरमध्ये गोंड राजाच्या दरबारी काही सरदार राहून यांनी सांगतात व ते स्वतःला वेगळे समजतात. यात माना हे ओझा होते.

इलबा आणि कोष्टी

पूर्वी हे पडगड्यांचे हलबांच्या जमीनदाऱ्या होत्या. हलबा स्वतःला उत्तरेकडील समजतात. गोंड राजाने त्यांना आश्रय दिला. बस्तरीया, छत्तीसगडीया आणि मरेठीया असे तीन प्रकार आहेत.

आदिवासी जातींच्या कितीही जमाती सांगता येतील. पण महत्त्वाचे म्हणजे प्रत्येकामध्ये त्यांची स्वतंत्र कला आहे त्यांच्या कलेचे जतन केले पाहिजे. सामाजिक परिवर्तनामुळे एखाद्या कलेचा ऱ्हास होत चालला आहे. परिवर्तन आवश्यक आहे. बदलत्या काळानुसार आदिवासींची प्रगती होते ही गर्वाची बाब आहे. प्रत्येक आदिवासींनी वडिलोपार्जित व्यवसाय न करता शिक्षण उच्च पदापर्यंत जाऊन आपले स्वतंत्र स्थान निर्माण केले पाहिजे. पण त्यांची ही नाट्यात्मक कलाही सांभाळल्या गेली पाहिजे. आदिवासींची कला त्यांनीच सांभाळावी असा विचार न करता कला शिक्षकांनी ती अभ्यासली पाहिजे. त्यांचे डेमसा नृत्य असो व दंडार त्यांच्यातील नाट्यविषयक जाणून घेतले पाहिजेत. नाट्यात्म अविष्कारांच्या समग्र रुपाचा विचार करताना त्यातील शब्द, उच्चारण, संहिता, चेहऱ्यावरील हावभाव किंवा सात्विक, आंगिक अभिनय, सहभागी व्यक्तींचे रंगभूमीवरील हालचाल, रंगभूषा, वेशभूषा, संगीत अशा विविध बाबींचा विचार करावा लागतो. आदिवासी लोककलेत या सर्व बाबी बघायला मिळतात. कारण त्यांची ही सादरीकरणाची कला आहे. (Performing Art) आणि ते सादर झालेच पाहिजे.

आदिवासी साहित्य किंवा संस्कृती किंवा लोकजीवन, सहजीवन या सर्व कागदोपत्री अभ्यासाच्याच बाबी आहेत. परंतु सर्वात आधी त्यांच्या कला Performing Art आहे. त्यांची संस्कृती ही कलेद्वारेच जास्त प्रकाशझोतात आहे. तेव्हा नाट्यशास्त्र विषयाची महाविद्यालयाची संख्या जास्त आहे. परंतु अभ्यासक्रमात आदिवासी लोककला हा प्रकार नाही. फुलके महोत्सवात आधी लोकनृत्यामध्ये आदिवासी नृत्याचा समावेश असायचा. त्यामध्ये झाडाची पाने गुंडाळली डोक्यावर साधी टोप चढवला की, झाली आदिवासी वेशभूषा, परंतु वेशभूषा, केशभूषा आणि अलंकार या बाबींना आदिवासी विशेष महत्त्व देतात. आदिवासींना सौंदर्याची, साजशृंगाराची आवड असते. शरीरावर गोंदण करुन घेणे, अंगाला रंग लावणे, केशभूषा करणे, गळ्यात रंगीबेरंगी मण्यांच्या माळा घालणे, उपलब्ध फुलांच्या आणि लहान आकारांच्या फळांच्या किंवा बियांच्या माळा गळ्यात घालणे. डोक्यावर फुले माळणे, रंगीत दगड आणि कवड्यांपासून तयार केलेले अलंकार घालणे, मोरपिसांचे आदिवासींना खूप आकर्षण असते म्हणून खूप मोरपीस असलेला मुकूट पुरुष मंडळी घालतात. पायात आणि कमरेला घुंगरु बांधतात. कवड्यांचे मनगटे व हातात काठी आणि अंगाला राख लावतात. या सर्व बाबी आदिवासींच्या वेशभूषांच्या आहेत. परंतु याचा आपण विचार करत नाही. तेव्हा अभ्यासक्रमात आदिवासींची लोककला हा विषय असेल तर सर्व अभ्यासक त्यांच्या संस्कृतीचा पूर्णपणे अभ्यास करतील आणि पर्यायाने आपण आदिवासींच्या लोकसंस्कृतीचे जतन करु शकू.

आज राष्ट्रीय परिषदेसाठी आदिवासी साहित्य आणि लोककला हा विषय आपण घेतला. लोककला हे Performing Art आहे. तेव्हा इथे जरी मराठी विषयाचे श्रेष्ठ, ज्येष्ठ, विद्वान जाणकार असतील तरी त्यांनीही प्रयत्न करावेत आणि नाट्यशास्त्र सारख्या विषयात

आदिवासींचे लोककला हा स्वतंत्र अभ्यासक्रमाचा विषय ठेवण्याची मागणी करण्यास हरकत नाही. आदिवासींची लोककला आदिवासींनी जतन करावी किंवा आपल्या समाजाचे समजून सुशिक्षित आदिवासींनीच प्रयत्न करावेत हा संकुचित विचार आपण काढून टाकला पाहिजे आणि नवीनी आदिवासींच्या नाट्यविकासाला प्रोत्साहन दिले पाहिजे.

संदर्भग्रंथ सूची


१) लोकरंग भूमी - प्रभाकर मांडे
२) लोकसाहित्य लोकसंस्कृती - डॉ. [illegible]
३) लोकसाहित्याचे अंतःप्रवाह - प्रभाकर मांडे
४) समग्र झाडीपट्टी - हिरामण लांजे, रामानंद
५) आदिवासी साहित्य - डॉ. सुदाम जाधव



**Ajanta Prakashan**
**Aurangabad**

ISO 9001:2008 QMS
ISBN/ISSN

AN INTERNATIONAL MULTIDISCIPLINARY RESEARCH JOURNAL

- AJANTA - ISSN 2277 - 5730
- GENIUS - ISSN 2279 - 0489
- CAME-C - ISSN UPCOMING
- ROYEL - ISSN 2278 - 8158
- IDEAL - ISSN 2319 - 359X
- ELLORA - ISSN UPCOMING

मासिक
**नाट्यशास्त्र**
मराठवाड्यातील पहिले सांस्कृति / क्रिडा मासिक

**NATIONAL CONFERENCE ON JANUARY 2013**

**अजिंठा स्कूल ऑफ ड्रामा अॅण्ड फिल्म ट्रस्ट, औरंगाबाद**

**Dance / Drama / Music**

Jaisingpura, Near University Gate, Aurangabad. (M.S.) 431 004 (INDIA)
Contact : (0240) 6969427, Cell : 9579260877, 9822620877
E-mail : anandcafe@rediffmail.com, info@ajantaprakashan.com
Website : www.ajantaprakashan.com

M.L. & G.E. Society's

# Dr. (Sow.) Indirabai Bhaskarrao Pathak Mahila Kala Mahavidyalaya, Aurangabad (M.S.)

Estd 1970

UGC Sponsored National Conference

**"Contribution of Women in Indian Music"**

30th, 31st August 2013

Organized by

## Department of Music

## Certificate

*This is to certify that Prof. / Mrs./ Mr.* Dushyanata Ramteke

*From the College/University* Sow. K.S.K. College, Beed.

*Chaired a Session /Attended / Presented a paper titled* मा. विजया शिरोलेजी का दलित रंगभूमिको योगदान. *on 30th, 31st August 2013*


Dr. Parag Choudhari
HOD & Convener

Prof. Dilip Dodke
Organizing Secretary

Dr. Rajkumari Gadkar
Principal & Chief Organizer



डॉ. पराग चौधरी




प्रा. दिलीप दोडके

भारतीय संस्कृती में संगीत का अपना विशिष्ट महत्व है। संगीत का उपयोग कई आंदोलनों को सफल बनाने में सिद्ध हुआ। प्रत्येक युग की अपनी रंगत अपनी दृष्टी और अपनी गंध होती है। आदीकाल, मध्यकाल, आधुनिककाल का सृजन इसी नियम की चोट सहकर सामने आया है। इस युग में संगीत भावावेग का विषय हो गया था।

तेरहवी शती देवगिरी राज्य में पं. शारंगदेव, पं. गोपालनायक इन्होंने संगीत कला में अपना स्थान बनाया। इस भूमी में उन्हें आज भी सम्मान दिया जाता है।

प्रस्तुत पुस्तक अध्ययन-अध्यापन और परिक्षण इस महत्वपूर्ण अंग शिक्षण परिवेश में समुचित परिवर्तन लाने तथा शैक्षिक प्रक्रिया को प्रभावशाली बनाने में विशेष योगदान दे रहा है। डॉ. पराग चौधरी, प्रा. दिलीप दोडके जी का यह संकलन संगीत क्षेत्र में अपनी तरह का पहला मौलिक प्रयास है। प्रस्तुत पुस्तक जिज्ञासु पाठकों, समग्र नारी समाज के लिए प्रेरणादायक है।

– [illegible]



चिन्मय
प्रकाशन, औरंगाबाद.
संपर्क : मो. ९८२२८७५२१९
ISBN 978-81-23916-77-8

भारतीय संगीत में महिलाओं का योगदान




# भारतीय संगीत में महिलाओं का योगदान

## Contribution of Women in Indian Music

संपादन :

डॉ. पराग चौधरी प्रा. दिलीप दोडके



42

# प्रा.विजया शिरोलेजी का दलित रंगभूमिका योगदान

प्रा.दुष्यंता रामटेके
सहाय्यक प्राध्यापक (नाट्यशास्त्र विभाग)
सौ.के.एस.के.महाविद्यालय,बीड.

भारत में दलितोंका जीवन, अभावो और वेदनासे भरा हुआ है । दलित समाज आज भी दु:खी एवं उपेक्षित है । भारत के इन्ही दलितोंके दु:ख दर्द को मुखरस्वर देने के लिए, ही मैंने उपरोक्त विषय का चयन किया है । मेरा यह मानना है की, रंगमंच के माध्यम सेही इस देश में दलितोंकी वेदना मुखर हुई है इसका अपवाद आत्मकथाएं है । दलित रंगमंच की यात्रा लोकरंगभूमी ,तमाशा-सत्यशोधकीय जलसा- आंबेडकरी जलसा से होती हुयी आज के दलित रंगमंच तक की एक दुर्गम यात्रा है । नाटकों और विशेषकर दलित नाटकों में आरंभिक काल में स्त्रियोंकी भूमिकाएं पुरुष ही निभाते थे । ऐसे समय में प्रा.विजया शिरोलेजी दलित रंगभूमिसे जुडी और अभिनय करना आरंभ किया । वे अभिनय के अलावा संगीत एवं आकाशवाणी से भी जुडी रही कुल मिलाकर उनका व्यक्तीत्व बहुआयामी रहा है । मराठी रंगमंच एवं मराठी दलित रंगमंच से उनका गहरा संबंध रहा और है । १९५२ में जब वे चार साल की थी भीमजयंती जलसा में शामिल हुई । गायन,नृत्य, अभिनय ये सभी गुण उन्हे विरासत में प्राप्त हुए । स्कूल में पढते समयभी वे विविध सांस्कृतीक कार्यक्रमोंमें सहभाग लेती थी । उनकी महाविद्यालयीन शिक्षा मिलिंद महाविद्यालय औरंगाबाद मे हुई, जहांपर वे राष्ट्रगीत और महाराष्ट्रगीत, बुद्धगीत गाती थी । इसी समय उन्होंने सन १९६३-६४ मे "मायका पुरुष लांबोला" यह नाटक खेला यह उनके जिवन का पहला नाटक था । मिलींद महाविद्यालय की ओर से उनकी गायन में रूची देखकर उन्हे महान संगीतज्ञ साधना वैद्य जी के पास सीखने हेतु भेजा गया ।१९६५-६६ में मिलींद महाविद्यालयने उन्हे गानकोकीळा इस उपाधी से गौरवान्वित किया । सन १९६९ में विजया जी का विवाह श्री प्रभाकर शिरोळे जी के साथ संपन्न हुआ । विवाह के बाद भी वे अपना परिवार संभालते हुए,रंगमंच और संगीतसे जुडी रहीं । प्रा.विजया शिरोले जी के देवर चंद्रकांतजी शिरोले भी नाटककर्मी थे । इस सब में विशेष बात यह है की, वे दलित आंदोलनसे एक सच्ची कार्यकर्ती के रूपमें जुडी है और समाजके सामने एक आदर्श रखा । दलित रंगमंचपर हम यदी दृष्टी डाले तो

घुणयात्रा के बाद आठवणींचे पक्षी यह नाटक दलित रंगमंच का प्रथम नाटक सिद्ध होता है । महानिर्वाण इस नाटक में स्त्री भूमिका के लिये कोई महिला नहीं मिल रही थी तब मेडम ने हामी भरी और केवल आठ दिनों में नाटक की संहिता मुखोद्गत भी कर ली । पच्चीस वें आमगार कल्याण राज्य नाट्य प्रतियोगिता में महानिर्वाण इस नाटक को पुरस्कार प्राप्त हुआ साथ हि मेडम को उत्कृष्ट अभिनय का पुरस्कार मिला । सन १९८० में विजया शिरोळे जी ने मराठवाडा विश्वविद्यालय के नाट्यशास्त्र विभाग में प्रवेश लिया इससे उनके व्यक्तित्व एवंम अभिनय क्षमता को एक नया निखार प्राप्त हुआ । प्राय: सभी नाटको में मेडम केंद्रीय भूमिका निभाती थीं । विश्वविद्यालय के नाट्यशास्त्र विभाग में सन १९८१ से नाट्यमहोत्सव का आरंभ हुआ जिसमें डा.कुमार देशमुख का अरण्यक तथा प्रा.अनुर अवलखांब का गाढवाचं लग्न इन नाटकों का मंचन किया गया । उपरोक्त दोनो नाटक एक दुसरे से बिल्कुल भिन्न थे, एक ऐतिहासिक था तो दुसरा लोक रंगमंच के तमाशा से जुडा था । उक्त दोनों नाटकों में विजया शिरोळेजी की भूमिकाओं को दर्शकों ने खूब सराहा । औरंगाबाद के सभी दैनिको में इन दोनों नाटकों पर खूब लिखा गया । सन १९८०-८० में, भारत के जानेमाने निर्देशक डॉ शशिकांत जी बऱ्हाणपूरकर जो अभी डॉ.बाबा साहेब आंबेडकर मराठवाडा विश्वविद्यालय औरंगाबाद के नाट्यशास्त्र विभाग प्रमुख है, उन्होंने कोर्ट मार्शल और दुःस्वप्न मानव इन नाटको का मंचन किया । उनमें मेडम ने प्रमुख भूमिका निभाई थी । यह दोनो नाटक भी चर्चा का विषय बने और खूब तारीफ हुई ।

सन १९७८ में मराठवाडा विश्वविद्यालय के संदर्भ में नामांतर का आंदोलन आरंभ हो गया इसी पार्श्वभूमीको लेकर प्रकाशजी त्रिभुवन का नाटक थांबा राजमराज्य येतंय लिखा गया । यह नाटक मेडम के जीवन में महत्त्वपूर्ण रहा क्योंकी यह नाटक गली से लेकर दिल्ली तक खेला गया । दिल्ली के श्रीराम थियेटर के तत्वावधान में आयोजित आंतर राज्य नाटक महोत्सव में भी यह नाटक खेला गया । उस समय थांबा रामराज्य येतंय इस दलित नाटक ने दिल्ली में पहली बार महाराष्ट्र का प्रतिनिधीत्व किया । यह हमेशा ही हमलोगों के लिए गौरव की बात है । मराठी रंगमंच का भी ये पहिला नाटक है, जो राज्य का नेतृत्व किया था । यह नाटक देखने के लिए आंतरराष्ट्रीय किर्ती के नाटककार पिटर ब्रुक भी उपस्थित थे । उन्होंने विजया शिरोळेजी के अभिनय की खूप प्रशंसा की । विशेष बात यह है कि दिल्ली के उस नाट्यगृह के बाहर मेडम की एक बडी तस्वीर भी लगाई गई थी । दिल्ली के दैनिको में इस नाटक पर भरपूर लिखा गया । बाद में महाराष्ट्र में भी अनेक स्थानों पर यह नाटक खेला गया यह नाटक देखकर मराठी

नाटक और सिनेमा के महान कलाकार निलू फुलेजी ने भी इसकी स्तुती की थी । विविध सामाजिक आंदोलनों से नीलू फुले संबंध थे इसलिये उन्होंने कहा यह आंदोलन जारी रखो ।

सन १९८५ तक आते आते दलित रंगमंच की धूम थी । त्र्यंबक महाजन जी ने मंडम के लिए विशेष और पर मुलेटी इस नाटक का मराठी में अनुवाद किया । इसका पहला प्रयोग पुना के बालगंधर्व में संपन्न हुआ । वहा पर रात के दो बजे तालीयों की गडगडाहट के बीच यह नाटक खेला गया । दर्शकों से यह कहते सुना गया कि नाटक कैसे खेला जाये यह औरंगाबाद वालों से सीखें । यह मंडम के लिए बडा पुरस्कार था इसके पश्चात मंडम की प्रमुख भूमिका वाला नाटक गुडबाय डॉक्टर नाटक और एक शून्य बाजीराव यह दो नाटक खेले गये जिन्हें खूब प्रशंसा मिली। राज्य कामगार कल्याण केंद्र के पुरस्कार वितरण समारोह में विजया मेहता और विजया शिरोले उपस्थित थी उस अवसरपर विजया मेहता जी ने विजया शिरोळे जीसे कहा था कि, रंगभूमि एक ही होनी चाहिये यह दूसरी दलित रंगभूमि किस लिए। यह मंच भी तुम्हारी समस्याओं को प्रदर्शित करता ही है ।

तब शिरोले मॅडमजीने कहा 'आप' जिस प्रकार समस्या को रखते हैं उससे अलग तरिके से हम इसे प्रदर्शित करते है क्योंकि जिसने इन समस्याओं को झेला है, अनुभव किया है । वह अच्छे ढंग से प्रदर्शित करता है । जो जो दलित समस्याएँ है उससे आप अपरिचित है, और यह सवाल एक जनजाती का नहीं है। समुस्त देश के पिडीत बहुजन जाती का है । और सभी बहुजनों को जागृत कराने के लिए हम यह प्रयास करते है । संगीत नाटक अकादमी में प्रसिद्ध नाटककार दत्ता भगत के नाटक वाटा पळवाटा का अनुवाद त्र्यंबक महाजनजी रास्ते-चोररास्ते इस नाम से किया । इसमें मॅडम की मुख्य भूमिका थी ।नाटकों के अलावा मॅडमने आंबेडकरी जलसों में भी गायन किया ।महात्मा फुलेजी के नाटक तृतीय रत्न नाटक का प्रयोग भारत ने पहली बार सन १९८९ में रुस्तुम अचलखांब ने प्रस्तुत किया । इस नाटक में मॅडम ने निवेदिका की भूमिका बहुत खुबसूरती से निभाई ।

सन १९७६ में औरंगाबाद में आकाशवाणी का आरंभ हुआ । मॅडम ने आकाशवाणी पर अपने पती एवंम देवर के साथ अनेक नाटकों को प्रसारण किया ।

- आकाशवाणी की विशिष्ट कलाकारों में उनका नाम था जिन्हें अधिक से अधिक एनप कभी भी आमंत्रित किया जाता था ।

**निष्कर्ष :** कुल मिलाकर प्रा.विजया शिरोळे जी का व्यक्तित्व बहुआयामी रूप में हमारे सामने आता है जो आज के कलाकारों के लिए एक आदर्श है ।दलित आंदोलनों में सहभाग , विश्वविद्यालय के नामांतर आंदोलनों में सहभाग, नाटक ,संगीत ,आकाशवाणी आदि विविध क्षेत्रों से जुडा उनका बहुआयामी कलाकार व्यक्तित्व वाकई में प्रशंसनीय है । उनकी परंपरा को आगे बढाने की आवश्यकता है । प्रा.विजया शिरोळेजी ने दलित रंगमंच को ऊँचा उठाने और आगे बढने में जो महत्वपूर्ण भूमिका निभाई उसमें उनके साथ दलितेतर रंगकर्मी भी सहभागी है । यह बात हमारे सामने यह संदेश देती है कि मानव यहाँ से वहाँ तक एक समान है और सभी की पीडा, वेदना भी एक समान है । हम सबको चाहिये की हम सब मिलकर दलित रंगभूमी को आगे बढाये और दीन-दलितों की पीडा को रंगमंच के माध्यम से स्वरप्रदान करे ।

संदर्भ ग्रंथ सूची :


१)साक्षात्कार के आधार पर ।
२)महाराष्ट्रीय नाटककार -प्र. अंबक प्रकाशन, प्रा.प्रभाकर बागले ।
३)हिन्दी उपन्यास और दलित नारी -डॉ.कुसुम मेघवाल ।
४)दलित रंगभूमि और नाटक -भवन धावडे ।
५)नामांतर पर्व -श्यामकुमार भडागले ।


❖❖❖

UGC SPONSORED TWO DAY NATIONAL CONFERENCE ON

# Modern Approaches and Innovation in Psychology

(Multidisciplinary School)

**Organized By**

DEPARTMENT OF PSYCHOLOGY

Kohinoor Shikshan Sanstha's

## Kohinoor Arts, Commerce & Science College

Khultabad, Tq. Khultabad, Dist. – Aurangabad - 431101 (M.S.)

# Certificate

*Is Hereby Awarding This Certificate To Prof. / Dr. / Mr. / Ms.* प्रा. दुष्यंता रामटेके

*In Appreciation Of His / Her Active Participation In The Technical Session Held On 17th And 18th February 2014,*

*As Delegate. He/She Has Also Presented / Authored A Scientific Research Paper Entitled*

" सामाजिक मानसिकतेत परिवर्तन घडविण्यात लोककलांचा सिंहाचा वाटा "

| | | | | |
|---|---|---|---|---|
| I/C Principal<br>Dr. Shaikh Mohd. Arif | Hon'ble Mazhar Khan<br>Secretary<br>Kohinoor Shikshan Sanstha | Convener<br>Dr. Baig Akhtar Mirza | Hon'ble Smt. Asma Khan<br>President<br>Kohinoor Shikshan Sanstha | Organizing Secretary<br>Dr. Charulata Pradhan |

# मानसशास्त्र :
# बहुज्ञानशाखीय विचारप्रवाह

संपादक
डॉ. चारुलता प्रधान

सह संपादक
डॉ. शेख मो. आरीफ  प्रा. एम.एल. हिवाळे
प्रा. टि.एस.मोरे

ISBN 978-93-82504-48-1

IJCMAIR ISBN 978-93-82504-48-1

Research Paper — Dramatics

# सामाजिक मानसिकतेत परिवर्तन घडविण्यात लोककलांचा सिंहाचा वाटा

प्रा. दुष्यंता रामटेके
श्री. के.एस.के कॉलेज, बीड

सामाजिक मानसशास्त्र म्हणजे सामाजिक सांस्कृतिक संदर्भात मानवी वर्तनाचा शास्त्रशुद्ध अभ्यास करणारी मानसशास्त्राची एक शाखा. समाज मानसशास्त्राची बीजे प्राचीन तत्त्ववेत्त्यांच्या लेखनापुर्वी आढळतात. प्लेटो आणि ॲरिस्टॉटल या तत्त्वज्ञानी सामाजिक जीवनातील प्रश्नांचा विचार केला होता. जाँ जॅक रुसो यांनी व्यक्ती आणि समाज यांच्या संबंधाबाबत चिंतन केले होते. प्रसिद्ध फ्रेंच समाजशास्त्रज्ञ इमील दुर्खेम यांनी समुहाच्या जाणिवांच्या अभिव्यक्तीचे तत्त्व मांडले. इंग्लंडमधील स्पेन्सर या तत्त्ववेत्याने उत्क्रांतीवादाची कल्पना सामाजिक विकासाला लावण्याचा प्रयत्न केला. जगातील अशा अनेक मानसशास्त्रज्ञांनी आपले विचार मांडले आहे.

अशा प्रकारे सामाजिक प्रभाव आणि व्यक्तिगत वर्तन यांमधील संबंधाचे आकलनाशी पुरविली गेली या क्षेत्रात सर्वप्रथम अमेरिकेत संयुक्त संस्थानात संशोधनास सुरुवात झाली. त्यावेळेपासून सामाजिक मानसशास्त्र ही आंतरराष्ट्रीय मान्यताप्राप्त एक प्रणाली वा शास्त्र म्हणून विकसित झाले.

माणसाच्या भोवतालचा परिसर जसा भौतिक तसा सामाजिक आणि सांस्कृतिकही असतो. व्यक्तींच्या आंतरक्रिया (इंटरॲक्शन) होत असतात. आणि अशा सामाजिक-सांस्कृतिक आंतरक्रियांमधून व्यक्तींच्या व्यक्तिमत्त्वाची जडणघडण होत असते. सामाजिक आंतरक्रियेमुळे माणसांमध्ये समान विचारशैली, समान भावना आणि समान वर्तनशैली विकसित होण्यास सहाय्य होते आणि समाज मनात परिवर्तन घडून एक नवीन सशक्त समाज निर्माण होतो.

परंतु वेगवेगळ्या विचारांच्या समाजात आंतरक्रिया घडून परिवर्तन होणे हे सहज शक्य नाही. आणि आपल्या भारत देशाचा जर विचार केला तर इथे समाज जाती जातीत वाटून दिला आहे. शासित आणि शोषित असे दोन वर्ग पहावयास मिळतात शासित आणि शोषित असे दोन वर्ग पहावयास मिळतात. शोषित समाज गुलामासारखी शासित समाजाची चाकरी करायचा. उच्च वर्णीयांकडून शोषित समाज पिळला जात होता. अशा वातावरणात शासित आणि शोषित दोन्हीही वर्गाची मानसिकता बदलवणे म्हणजे अतिशय अवघड काम. उच्चवर्गीय स्वतःला राजे, किंवा अधिकार गाजवणारे समजत असल्यामुळे त्यांना समजावण्यापेक्षा; पिडीत समाजमनाला जागृत केले, तर तो समाज आपली गुलामी नाकारुन स्वतंत्रपणे जगू लागेल, हा एकच उपाय, या समाजासाठी योग्य होता.

अशा समाजाची मानसिकता बदलविण्याचं काम लोककलेनं केलेलं म्हणजे लोकांनी, लोकांसाठी, लोकांकडून, लोकांमधील सादर केलेली कला लोकसमुहाचे दैनंदिन जीवनाशी संबंधित परंतु कलात्मक आविष्कार लोककला म्हणून ओळखले जातात. सामाजिक मानसशास्त्राला लोकांच्या तळागाळाशी नेऊन नवा समाज निर्माण करण्यात लोकसमुहाच्या लोककलेचा सिंहाचा वाटा आहे. त्यापैकी प्रामुख्याने १) आंबेडकरी जलसे २) कीर्तन ३) पोवाडा ४) भारुड इत्यादी कलांचा समावेश आहे. मी या चार लोककला प्रकाराचा संक्षिप्त आढावा घेणार आहे. कारण, या लोककलांमध्ये सामाजिक मानसिकता बदलविण्याची ताकद आहे.

प्रख्यात स्विस मानसशास्त्रज्ञ कार्ल युंग यांनी अबोध समूह मनाचा सिद्धांत सांगितला आहे. "अबोध समूहमन व्यक्तिमनातही कार्यरत असते. त्याच्या प्रेरणेने होणारे आविष्कार हे व्यक्तिनिष्ठ असले तरी समूहमनाला आवाहन करणारे असतात समूहाला ते आपलेच वाटतात" या सिद्धांताचा अभ्यास लोककलावंतांनी केला नसला तरी दैनंदिन जीवनातून अनुभवलेले सादरीकरण त्यांना माहित आहे. म्हणून या लोककला नेहमी लोकमनाला भावत म्हणून राहिलेल्या आहेत. भारत देशातील समाजाची मानसिकता बदलविण्याची जास्त ताकद या लोककलांमध्ये आहे. लोककलेद्वारे समाजाचे रंजन, प्रबोधन, उद्बोधन होत असते.

**१) आंबेडकरी जलसे :**

आपल्या भारत देशात समाज जाती जातीत वाटून दिलेला आहे. त्यामध्ये दलित, गैर-दलित समाज असा होता की, त्यांना जनावरांपेक्षाही हिन दर्जाची वागणूक दिली जात होती. गावीन भाकर आणि कुत्र्यांना खायला देणाऱ्या या समाजात एका विशिष्ट वर्गाला पाणीही दिल्या जात नव्हते. तो समाज पिळला जात होता. शोषिला जात होता. त्यांच्या स्पर्शाने किंवा सावलीने माणसाला विटाळ होत होता. आणि हा विटाळ गायीच्या मुत्राने नष्ट होत होता. म्हणजे 'मुत्र' पवित्र पण 'माणूस' अपवित्र अशा आपल्या भारतीय समाज या संस्कृतीला, रुढी परंपरेला मोडण्याचे काम डॉ.बाबासाहेब आंबेडकरांनी केलं. त्यांच्या भाषणात,लिखाणात, एवढी ताकद होती की, त्यांनी संपूर्ण पिडीत, शोषित आणि वंचित अशा समाजाची मानसिकता बदलून टाकली. समाजाची ही क्रांती डॉ. बाबासाहेबांमुळे झाली. अहो, फक्त एकट्याच्या भाषणावर लाखो लोक बुद्धाला शरण गेले. पण बाबासाहेब स्वतः प्रत्येक जिल्ह्यात, प्रत्येक गावात, प्रत्येक माणसापर्यंत जाऊ शकत नव्हते. मग हे आंबेडकरी विचार जनसामान्यांपर्यंत पोहचला कसा तर... आंबेडकरी जलशांच्या माध्यमातून सत्यशोधकीय जलशांच्या प्रेरणेतून लोककलावंतातून आंबेडकरी जलशाची स्थापना केली आणि बाबासाहेबांच्या हयातीतच असंख्य [illegible] शाहिरांच्या माध्यमातून

ISBN 978-93-82504-48-1

बुद्ध, फुले, शाहू, आंबेडकरी विचार जनसामान्यापर्यंत पोहचविला आणि संपूर्ण पिडीत समाजाची मानसिकता बदलविण्याचे काम केले. आजच्या काळातही लोकशाहीमुळे आपण स्वतंत्र झालो असलो तरी जातीवाद तसाच आहे. फक्त त्याचं स्वरुप बदललेलं आहे कारण आजचा दलित हा शिकलेला आहे. पण आंबेडकरी जलसे आजही समाज परिवर्तन करुन समाजाची मानसिकता बदलविण्याचे कार्य मोठ्या जोमाने करत आहेत.

२) किर्तन :

वेगवेगळ्या पद्धतीने गायन, संगीत, अभिनय आणि क्वचित नृत्य यांच्यासह सादर केलेल्या भक्तीरसपूर्ण, कथारुप एखाद्या निवेदनाला किर्तन असे म्हणतात. किर्तनाचे नारदीय किर्तन आणि वारकरी किर्तन असे दोन प्रकार आहेत. पण ही वाजवी भाष्य न करता समाजाची मानसिकता बदलवून टाकणाऱ्या किर्तनाविषयी सांगणार आहे. अनेक किर्तनकारांनी त्यांच्या किर्तनाने छत्रपती शिवाजी महाराजांच्या काळात, ब्रिटीशांच्या काळात लोकजागृतीचे काम केले. आणि नंतरच्या काळात संत गाडगेबाबा सारखे किर्तनकार आपल्या महाराष्ट्राला लाभले हे आपले भाग्य. आपला समाज अज्ञान, अंधश्रद्धा, भोळ्या समजूती, अनिष्ट रुढी परंपरा ह्या सर्वांनी ग्रासलेला होता. गाडगेबाबांनी ह्या रुढी परंपरा दूर करण्यासाठी आपले आयुष्य वेचले. यासाठी त्यांनी किर्तनाच्या माध्यमाचा अवलंब केला. समाजाची मानसिकता बदलवून मानवता हाच खरा धर्म आहे. याची जाणीव समाजाला करुन देत आहे. याची जाणीव समाजाला करुन देत होते. किर्तनात हरीनाम न घेता समाजातील वाईट चालीरीती, पशुहत्या, शिक्षणाचे महत्त्व, चांगल्या सवयी, सार्वजनिक साफसफाई इ. चे महत्त्व लोकांना समजावून देत असत. त्यांचा उपदेश आजही समाजाला गरजेचा आहे.

उदा. भुकेलेल्यांना - अन्न, तहानलेल्यांना - पाणी, बेघरांना-घर, निवारा, गरीब विद्यार्थ्यांना - शिक्षण, अंध-अपंग रुग्णांना - औषधे, मुक्या प्राण्यांना - अभय

शेवटपर्यंत त्यांनी शिक्षण प्रसाराचेही कार्य केले. गाडगेबाबांजवळ काहीही नसतांना फक्त एक गाडगं आणि खराटयाच्या आधारे, किर्तनाद्वारे समाज परिवर्तन घडवून आणले.

३) पोवाडा :

पोवाडा म्हणजे अस्सल मराठी काव्य. वीरांच्या पराक्रमाचे, विद्वानांच्या बुद्धिमत्तेचे, सामर्थ्य, गुण, कौशल्य यांचे काव्यात्मक वर्णन. आपल्या राज्यात संकटसमयी म्हणजे परकीयांचे आक्रमण असो किंवा लढाईत शत्रुला चारलेली [illegible] असो, यांचे दर्शन घडविणारे हे पोवाडे असतात. पोवाड्याने समाज समूहाला राज्यात घडून गेलेल्या पराक्रमाची, महापुरुषांची आठवण करुन, त्यांची शौर्यगाथा ऐकून समाज मनालाही शौर्याचे स्फुरण चढावं असा प्रयत्न केला जातो. महात्मा ज्योतिराव फुले यांनी छत्रपती शिवाजी महाराज यांच्यावर खूप सुंदर पोवाडा लिहला. साहित्यरत्न अण्णाभाऊसाठेंनी लेनीन यांच्या पोवाडा लिहला. अलीकडच्या काळात अण्णाभाऊ, शाहिर अमर शेख आणि गव्हाणकर या त्रिमूर्तीने संयुक्त महाराष्ट्राच्या चळवळीत पोवाड्यांच्या माध्यमातून केलेली कामगिरी सर्वज्ञात आहे.

४) भारुड :

समाजमन जिंकण्याची ताकद असणारी ही कला जेवढी रंगतदार आहे तेवढीच ती प्रबोधकही आहे. नाट्य, सखोल आणि संगीताच्या मिलाफातून रंगतजाणारे भारुड जनजागृतीचे प्रभावी माध्यम आहे. नैतिक शिकवण देणारे मराठीतील रुपकात्मक नाट्यगीत. भारुड अनेकांनी लिहलेले असली तरी, संत एकनाथांची भारुडे जास्त लोकप्रिय झाली. कारण त्यांच्या भारुडात विविधता, नाट्यात्मता, विनोद आणि गेयता असते. म्हणून प्रेक्षकांना जास्त भावते. समाजातील अन्याय, अत्याचार, वाईट व्यसन आणि अंधश्रद्धा या बाबींवर द्विअर्थी गीतातून रंजनाद्वारे प्रबोधन केल्या जाते. पर्यायाने समाजाची मानसिकता बदलवून परिवर्तन करण्यास भाग पाडल्या जाते. आणि विशेष म्हणजे भारुडात समस्या सांगून निरुपण केल्या जाते. एक बाब मी आवर्जून नमूद करु इच्छिते की, भारुड फक्त पुरुषचं म्हणायचे पण बीड जिल्ह्यातील केवराई तालुक्यातील **मीराबाई उमप** यांनी भारुडात उच्चांक गाठला. अत्यंत हालाखीच्या परिस्थीतून आतापर्यंत त्यांनी कितीतरी समाज मनात परिवर्तन घडवले. सध्या भारुडाच्या माध्यमातून आंबेडकरी विचार जनसामान्यापर्यंत पोहचविण्यात कार्य त्या करत आहेत.

निष्कर्ष :

आजच्या काळात ह्या लोककला लुप्त होतांना दिसतात. समाज प्रबोधनासारखं मोठ कार्य त्यांच्या गवळ आहे. अजुनही कित्येक समाजाची मानसिकता त्यांना बदलायची आहे. तेव्हा त्यांचे संवर्धन होणे गरजेचे आहे. त्यांना मोठ व्यासपीठ उपलब्ध करुन देणे आवश्यक आहे, शिवाय शासनामार्फत त्यांना आर्थिक पाठबळ मिळवून देणे यासाठी प्रयत्न करायला हवे. कारण समाजमन, सामाजिक मानसिकता ह्यांच्या परिवर्तनासाठी लोककलांचा सिंहाचा वाटा आहे.


संदर्भ

१. डॉ. [illegible] भांडे - लोकरंगभूमी.
२. डॉ. [illegible] ढगाखे - [illegible] मानसशास्त्र.
३. डॉ. [illegible] - लोककला [illegible].
४. डॉ. गंगाधर पानतावणे - [illegible].
५. डॉ. [illegible] - लोकरंगभूमीची [illegible].